श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, पुणे

# पंचायतन याग, शक १९४४

**सोमवार, दि. २६ डिसेंबर २०२२ ते रविवार, दि. १ जानेवारी २०२३**

| जानेवारी २०२३ | विशेषांक | खासगी वितरणासाठी | पाने ८ |



*पूर्णाहुती*

श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात, पौष शुद्ध चतुर्थी ते दशमी, शक १९४४; सोमवार, दि. २६ डिसेंबर २०२२ ते रविवार, दि. १ जानेवारी २०२३ या कालावधीत प्रतिवर्षाप्रमाणे पंचायतन यागाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी गणेश अथर्वशीर्ष, ब्रह्मणस्पती सूक्त, पंचसूक्त पवमान, विष्णुसूक्त, विष्णुसहस्रनाम, रुद्रसूक्त, रुद्र, मन्युसूक्त, सौरसूक्त, श्रीसूक्त, देवीसूक्त, सप्तशती पाठ, आदी अनुष्ठाने करण्यात आली. त्याचप्रमाणे श्रीमद् भागवत, श्रीमद् अध्यात्म रामायण, चारही वेदांच्या संहितांचे पारायण, श्रीसत्यदत्त पूजा, श्रीगणेश सहस्रनाम, श्रीविष्णुसहस्रनाम, श्रीशिवसहस्रनाम, श्रीदेवीसहस्रनाम,

श्रीसूर्यसहस्रनाम आदी पूजा करण्यात आल्या. भक्तगणांकडून 'श्रीस्वामी समर्थ जयजय स्वामी समर्थ ।' हा नामजप आणि अनेक सद्ग्रंथांचे पारायण करण्यात आले.

यज्ञकालात प्रतिवर्षाप्रमाणेच याही वर्षी 'वेदवेदांगचक्रवर्ती वे.मू. कै. दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी आणि याज्ञिकप्रवर वे.मू. कै. लक्ष्मणराव विनायक सप्रेगुरुजी स्मृती समिती'तर्फे वेदमूर्ती स्वानंद धायगुडे आणि श्री. नंदू शेजवळ यांचा सत्कार शनिवार, दि. ३१/१२/२०२२ रोजी आयोजित करण्यात आला होता.

वे.मू. किंजवडेकरगुरुजी आणि वे.मू. सप्रेगुरुजी या गुरुद्वयाने वेदाध्ययन, अध्यापन, विद्यार्थीवर्गाची जडणघडण आणि वेदसंवर्धनाच्या क्षेत्रात केलेल्या अमूल्य योगदानाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांच्या शिष्यवर्गातर्फे प्रतिवर्षी हा स्मृती सोहळा साजरा केला जातो आणि त्यानिमित्ताने समाजातील विविध क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे या हेतूने त्यांचा शाल, श्रीफळ, मानपत्र आणि सन्मानद्रव्य देऊन सत्कार केला जातो. या सत्कार समारंभाचे अध्यक्षस्थान श्री. कमलेश जोशी यांनी स्वीकारले होते. प्रमुख पाहुणे वे.मू. योगेश बोरकर आणि संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांच्या उपस्थितीत झालेल्या या समारंभाचा शुभारंभ वे.मू. मंदार क्षीरसागर आणि वे.मू. प्रथमेश पुरोहित यांनी केलेल्या ईशस्तवनाने झाला. वे.मू. स्वप्निल मुंडले, श्री जितेन्द्र आणि श्री. रवींद्र सप्रे यांनी पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत केले.

आपल्या प्रास्ताविक भाषणात वे.मू. प्रसाद निगुडकर या समारंभामागची भूमिका मांडताना म्हणाले, ''जीवन म्हणजे केवळ प्रकाश नाही किंवा केवळ अंधार नाही. तर तो आहे तेज-छायेचा लपंडाव, भरती-ओहोटीचा खेळ आणि सुखदु:खाचा समन्वय.




*डावीकडून – श्री. विकासराव वालावलकर, श्री. नंदू शेजवळ, श्री. कमलेश जोशी, वे.मू. स्वानंद धायगुडे, वे.मू. योगेश्वर बोरकर*

महर्षी व्यासांचे म्हणणे आहे की आपले जीवन म्हणजे काळ्या–पांढऱ्या धाग्यांचे वस्त्र आहे. सद्गुण आणि दुर्गुण जीवनात जोडीनेच पाहायला मिळतात. निर्जीव वस्तू वर फेकण्यासाठी जशी सजीवाची गरज लागते तशीच साधारणत: जीवनहीन बनलेल्या मानवाला देवत्वाकडे घेऊन जाण्यासाठी सजीव व्यक्तीची गरज भासते. आणि ती व्यक्ती म्हणजे गुरू! जो लघू नाही पण लघूला गुरू बनवितो तो गुरू. जो जीवनाला मनाच्या ताब्यात जाऊ देतो तो लघू आणि जो मनाचा स्वामी होतो तो गुरू. जीवनाच्या निसरड्या प्रवाहात जो स्थिर उभा राहू शकतो तो गुरू आणि म्हणूनच तो अस्थिर आणि अव्यवस्थित मनाच्या मानवाचा मार्गदर्शक बनतो. गुरुपूजन म्हणजे ध्येयपूजन. गुरूंचे जीवन म्हणजे ध्येयाची मूर्ती. ते ध्येयाचे साकार रूप असतात. मानवाच्या जीवनात ध्येय येताच संयम येतो. संयमाने शक्ती संग्रहित होते आणि शक्तीनेच मानव ध्येयाच्या जवळ जातो आणि शेवटी त्याचा साक्षात्कार होतो. अज्ञानाचा अंध:कार निवारण्यासाठी ज्ञानाची ज्योत पेटवणारा गुरू आणि जीवनविकासाची कामना राखणारा शिष्य यांचा संबंध अलौकिक असतो. 'अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानान्जनशलाकया । चक्षुरून्मीलितं येन तस्मै श्रीगुरवेनम:।' गुरूजवळ बसून 'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।' या गीतेच्या वचनानुसार शिष्य नम्रता, जिज्ञासा आणि सेवा यांच्याद्वारे गुरूजवळ असलेले ज्ञानामृत प्राशन करतो.

हिंदीतील एका दोह्यामध्ये गुरू–शिष्य परस्पर भूमिकेचे सुंदर वर्णन केलेले आहे. 'गुरू कुम्हार और शिष्य कुंभ है, घट घट काढे खोट । अंदर हात सहारा देत और बाहर मारे चोट ।।' गुरू कुंभार आहे आणि शिष्य कुंभ. कुंभार जसे बारीकसारीक दोष काढून घटाला योग्य आकार देण्यासाठी वरून थोपटतो, त्याचप्रमाणे गुरू शिष्याचे दोष काढण्यासाठी, त्याला योग्य आकार देण्यासाठी घड्याप्रमाणेच थापट्या मारतो. कुंभाराचा दुसरा हात घड्याला आतून काळजीपूर्वक आधार देत असतो तसा गुरूदेखील शिष्यावर आतून प्रेम करीत राहतो. अशा सद्गुरूंचे पूजन हे भारतीय संस्कृतीतील सुमधूर आणि भावार्द्र काव्य आहे. गुरूंजवळ पोहोचताच बुद्धी ग्रहणशील बनते. त्यांचा सहवास इतका मधूर असतो की त्यांच्यापासून दूर होण्यास मन तयार होत नाही. अशा गुरूंचे पूजन ही भारतीय परंपरा आहे. हिंदू संस्कृतीचा पाया आहे. शास्त्राने सांगितल्याप्रमाणे गुरुसेवा करून मौखिक परंपरेने श्रुतिंचे बुद्धीत जतन करून त्या पुन्हा पुढच्या पिढीत संक्रमित केल्या आणि ही परंपरा अबाधित ठेवली म्हणूनच या परंपरेचे आमच्यावर फार उपकार आहेत. त्याची परतफेड करणे शक्य नाही. परंतु 'गुरुराया आता हेचि मज द्यावे । स्मरण असावे तुझे सदा । नयनी तुझे रूप वाचे तुझे नाम । तेणे पूर्णकाम होईन मी ।' या उक्तीनुसार गुरूंचे स्मरण, ध्यान आणि मुखी नाम यानुसार गुरूंचे स्मरण चिरंतन राहण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन केलेले आहे.''

त्या अनुषंगाने वेदसम्राट किंजवडेकरगुरुजींचे वैदिकक्षेत्रातील उत्तुंग कार्याचे स्मरण राहावे व वैदिकपरंपरा अव्याहत सुरू राहावी यासाठी गेली २८ वर्षे वेदमूर्ती किंजवडेकरगुरुजींचे विद्यार्थी कै. प्रभाकर निगुडकरगुरुजी, वे.मू. वसंतराव फडकेगुरुजी, वे.मू. प्रकाश दंडगेगुरुजी यांनी ठेवलेल्या ठेवीतून उत्तम वेदाध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. तीन सहस्राचा ''वेदवेदांगचक्रवर्ती वे.मू. दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी स्मृतिपुरस्कार'' दिला जातो.




वे.मू. स्वप्निल मुंडले श्री. कमलेश जोशी यांचे स्वागत करताना



श्री. जितेंद्र सप्रे श्री. विकासराव वालावलकर यांचे स्वागत करताना

त्यानुसार या वर्षी जटाघन वे. मू. श्रीनिधी स्वानंद धायगुडे (आबासाहेब पटवर्धन वेदशास्त्र विद्यालय, पुणे) आणि जटाघन वे.मू. मयुरेश मंदार फडके (श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती पाठशाळा, पुणे आणि श्रीनृसिंहसरस्वती वेदपाठशाळा, आळंदी) यांना वे.मू. श्री. योगेश्वर बोरकरगुरुजी आणि श्री. कमलेश जोशी यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

''मंत्रद्रष्ट्या ऋषी-मुनींनी वेदवाक्य अक्षरनिबद्ध न करता कंठस्थ करून ठेवले यामागची कल्पना अशी आहे की प्राचीन काळापासून आपल्या सर्व गोष्टींचा ऱ्हासच होत आहे. या ऱ्हासातून आपली विश्वकल्याण करणारी वेदवाणी वाचवायची असेल तर ती कंठस्थपद्धतीनेच जिवंत राहील. या कल्पनेचा अवलंब केल्यामुळेच आज आपणाला हजारो वर्षांपूर्वीची वेदवाणी काना, मात्रा यांचा फरक न होता ऐकता येत आहे.'' असे सांगून सूत्रसंचालक वे.मू. निगुडकरगुरुजींनी या वर्षीचा याज्ञिकप्रवर वे.मू. कै. लक्ष्मणराव विनायक सप्रेगुरुजी स्मृतिपुरस्कार वेदरत्न श्री. स्वानंद शिवराम धायगुडे याना प्रदान करण्यात येत असल्याचे जाहीर केले.

वे.मू. सुशील पाटीलगुरुजी यांनी स्वानंद धायगुडे यांचा अल्पपरिचय करून दिला. धायगुडेगुरुजींचे ऋग्वेद शाखा अध्ययन, तसेच पद, क्रमान्त शिक्षण आळंदीला नृसिंहसरस्वती पाठशाळेत वे.मू. वसंतराव फडकेगुरुजी यांच्याकडे झाले. वे.मू. आठल्येगुरुजींकडे जटा, घन आदी विकृतींचे शिक्षण झाले. त्यांच्याच वडिलांकडे वे.मू. शिवरामशास्त्री धायगुडे यांच्याकडे ऋग्वेद षडंगाचे शिक्षण झाले. शाखा झाल्यानंतर त्यांनी काशीच्या राजवाड्यात ३५ वर्षांच्या खंडानंतर शाखा पारायण केले. राजांनी त्यांना सुवर्णांगुली देऊन त्यांचा विशेष सन्मान केला. त्यांनी शारदापीठम्, शृंगेरी; अवधूत पीठम्, मैसूर; वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणे; वेदान्त विद्यापीठम्, अहमदनगर अशा अनेक पीठांच्या परीक्षा दिल्या असून त्या सर्व परीक्षा ते पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. त्यांना वेदरत्न, ऋग्वेदचूडामणी, षडंगवित् अशा अनेक पदव्या मिळालेल्या आहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांनी बेलबागेत घनपारायण केलेले आहे. अनेक ठिकाणी श्रौतयज्ञ, संहिता स्वाहाकार, घनपारायण, वैदिक संमेलने यात सहभाग, शिवाय ते अध्यापनसुद्धा करतात. शृंगेरी येथे दर वर्षी ते परीक्षक म्हणून जातात.

यानंतर मानपत्राचे वाचन करण्यात आले.

।। श्रीगणेशाय नमः ।।

।। श्रीसद्गुरुवासुदेवानंतसरस्वत्यै नमः ।।

।। श्रीसद्गुरुसहजानंदसरस्वत्यै नमः ।।

वेदवेदांगचक्रवर्ती वे.मू. कै. दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी आणि याज्ञिकप्रवर वे.मू. कै. लक्ष्मणराव विनायक सप्रेगुरुजी स्मृती समिती, श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, पुणे.

वेदमूर्ती स्वानंद धायगुडे यांसी

सप्रेम नमस्कार,

वेदवेदांगचक्रवर्ती वेदमूर्ती कै. दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी आणि याज्ञिकप्रवर वेदमूर्ती कै. लक्ष्मणराव विनायक सप्रेगुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित या समारंभात आपण वेदाध्ययन, अध्यापन, ब्रह्मकर्म अशा क्षेत्रात निरलसपणे केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी समितीतर्फे हे मानपत्र आपणास अर्पण करतांना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

आपले क्रमान्त शिक्षण आळंदीला नृसिंहसरस्वती पाठशाळेत वे.मू. वसंतराव फडकेगुरुजी यांच्याकडे झाले. वे.मू. आठल्येगुरुजींकडे जटा, घन आदी विकृतींचे अध्ययन झाले आणि आपल्याच वडिलांकडे आपण षडंगाचे शिक्षण पूर्ण केले. शाखेचे अध्ययन झाल्यानंतर आपण काशीच्या राजवाड्यात ३५ वर्षांच्या खंडानंतर शाखा पारायण केले. काशीनरेशांनी आपणाला सुवर्णांगुली देऊन आपला विशेष सन्मान केला. आपण अनेक पीठांच्या परीक्षा दिल्या असून त्या सर्व परीक्षात आपण पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण झाले आहात. आपण वेदरत्न, ऋग्वेदचूडामणी, षडंगवित् अशा अनेक पदव्यांनी विभूषित आहात. आपले विद्यार्थीही घनपाठी म्हणून नावालौकिकास प्राप्त झाले आहेत. आपण अनेक ठिकाणी



*श्री. रवींद्र सप्रे वे.मू. योगेश्वर बोरकर यांचे स्वागत करताना*



*वे.मू. प्रसाद निगुडकर, सूत्रसंचालक*

श्रौतयज्ञ, संहिता स्वाहाकार, घनपारायण, वैदिक संमेलने यात सहभाग घेतला असून उत्कृष्ट अध्यापकसुद्धा आहात. शृंगेरी येथे दर वर्षी आपणास परीक्षक म्हणून निमंत्रित केले जाते हेही आपल्या विद्वत्तेचे गमकच आहे. वे.मू. कै. दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी आणि याज्ञिकप्रवर वे.मू. कै. लक्ष्मणराव विनायक सप्रेगुरुजी यांनी आयुष्यभर वेदव्रताची उपासना अत्यंत निष्ठेने केली. त्यांच्याच तपश्चर्येचे फलस्वरूप आज एक फार मोठा वेदव्रतींचा समूह समाजाला उपलब्ध झाला आहे. त्यांच्या शिष्यसमूहाकडून आपल्यासारख्या वेदव्रतींचा सत्कार होण्यात विशेष औचित्य आहे. आपणास आणि आपल्या कुटुंबीयांना उत्तम आयुरारोग्य लाभावे, ही वेदपुरुषाच्या आणि सद्गुरूंच्या चरणी प्रार्थना.

अध्यक्ष,

वेदवेदांगचक्रवर्ती वे.मू. कै. दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी आणि याज्ञिकप्रवर वे.मू. कै. लक्ष्मणराव विनायक सप्रेगुरुजी स्मृती समिति पौष शुद्ध नवमी, शक १९४४; शनिवार, दि. ३१ डिसेंबर २०२२

वे.मू. बोरकरगुरुजी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानदक्षिणा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आल्यावर सत्कारमूर्तींनी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले,''किंजवडेकर गुरुजींच्या स्मृतिप्रीत्यर्थ ठेवलेला सन्मान मला मिळाला याचा मला खूप आनंद झाला आहे. त्यांचे नाव घेतले की मनात वसिष्ठ, व्यासमुनी अशा प्रतिमा उभ्या राहतात. त्यांचे पूर्वायुष्य अत्यंत विपन्नावस्थेत तर उत्तरायुष्य अत्यंत संपन्नतेत गेले पण त्यांनी कधीही वेदविद्येशी प्रतारणा केली नाही. वेदविद्या जिवंत ठेवणे हे त्यांचे जीवनाचे ध्येय होते. रात्रंदिवस अभ्यास, घरी गेलं की सारखी आवृत्ती म्हणत राहायची असे त्यांचे जीवन होते. आपण सर्वांनी तो आदर्श समोर ठेवला पाहिजे.

सप्रेगुरुजींचे याज्ञिकीचे ज्ञानही असेच मोठे होते. केवळ वेदाचे ज्ञान अथवा केवळ याज्ञिकीचे ज्ञान याचा काही उपयोग नाही. वेदाबरोबरच याज्ञिक प्रक्रियांचे ज्ञानही असणे आवश्यक आहे. ब्रह्मदेवाने ही प्रजा उत्पन्न केली आणि यज्ञपुरुष आणि वेद यांना आज्ञा दिली की वेदांनी आणि ब्राह्मणांनी आम्हाला अन्न देऊन संतुष्ट करावे. वेदपुरुष किंजवडेकरगुरुजी आणि यज्ञपुरुष सप्रेगुरुजी यांनी या ठिकाणी अनेक वर्षे सेवा केलेली आहे. काकामहाराजांबद्दल बोलायचे तर माझ्याजवळ शब्दच कमी आहेत. पण मी त्यांना एक उपाधी देऊ इच्छितो. ते आधुनिक काळातील 'भोजराज' आहेत. भोजराज वेदनिष्ठ होते आणि विद्वानांचा सन्मान करणारे होते. त्यांच्या दरबारामध्ये नवरत्ने होती. काकांच्या दरबारातही योगेशजी बोरकर, मंदार फडके अशी विद्वत्‌रत्ने अनेक आहेत. येथे भगवंताची उपासना मोठ्या प्रमाणावर होत आहे. आधीच्या परंपरा काकामहाराजांनी सुरू ठेवलेल्या आहेत. श्रीकाकांची वेदनिष्ठा आणि वेदकार्य व्हावे यासाठीची तळमळ आम्ही अनेक वेळा घनपारायणाच्या निमित्ताने अनुभवली आहे. 'विनाश्रय: न शोभन्ते पण्डित:' असे म्हणतात. बोरकरगुरुजी ब्रह्मस्थानावर बसलेले असतात तेव्हा त्यांचे मोठेपण लक्षात येते. काकामहाराजांना विद्वान लोकांची जाण आहे. गुणाढ्य नावाचे एक कवी होते. त्यांनी एक सुंदर काव्य केले होते. पण त्याला लोकांकडून प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून ते वनामध्ये गेले आणि एकएक पान वाचून अग्नीत समर्पण करू लागले. ते पाहून पशुपक्षीही दु:ख करू लागले. हे वृत्त समजल्यावर एक राजा तेथे आला. त्या वेळी शेवटचे एक पुस्तक राहिलेले होते. ते त्याने गुणाढ्याची मनधरणी करून वाचविले. हे का झाले ? गुणाढ्याला आश्रय मिळाला नाही. येथे पंडितांना आश्रय मिळतो आणि त्यामुळे त्यांना सन्मान मिळतो. मला फडकेगुरुजींनी घडविलेले आहे. माझी योग्यता एवढी नसतानाही मिळालेला हा सन्मान मी त्यांच्या चरणी अर्पण करतो.''

यानंतरचे सत्कारमूर्ती नळजोडणी व्यावसायिक आणि मंदिरातील एकनिष्ठ स्वयंसेवक श्री. नंदू शेजवळ यांचा परिचय श्री. विजय जोशी यांनी करून दिला. ते म्हणाले, नंदू शेजवळ हे गेली सुमारे ३५-४० वर्षे मंदिरात प्लंबिंगची म्हणजे पाण्याचे नळ



वे.मू. मंदार क्षीरसागर आणि वे.मू. प्रथमेश पुरोहित – ईशस्तवन



श्रोतृवर्ग

जोडणीचे काम करीत आहेत. ते मंदिरात पाणी व्यवस्थेशी संबधित सगळीच कामे करतात. त्याचप्रमाणे सांडपाणी वाहून नेण्याची जी व्यवस्था आहे तीही तेच पाहतात. श्रीमहाराजांच्या काळात जेव्हा प्रथम ते आले त्या पहिल्या दिवसांपासून श्रीमहाराजांनी मंदिराच्या प्लंबिंगच्या कामाची जबाबदारी हळूहळू त्यांच्याकडे सोपविली आणि आज डेरवण येथे जे प्रचंड बांधकाम झाले आहे आणि होत आहे त्यांचीही प्लंबिंगची संपूर्ण जबाबदारी ते समर्थपणे उचलत आहेत. या चाळीस वर्षांत नंदू शेजवळ यांनी एका प्लंबिंग कंत्राटदाराकडे रोजंदारीवर काम करणारा एक कामगार ते आज ज्याना अगदी सहजपणे आणि प्रेमाने लोक 'नंदूशेट' अशी हाक मारतात अशा एका यशस्वी व्यावसायिकापर्यंत त्यांनी जो प्रवास केलेला आहे ते त्यांच्याच तोंडून ऐकण्यात खरी मजा आहे. त्यामुळे मी फक्त या सत्कारामागाची संस्थेची भूमिकाच तेवढी सांगतो.

आज आपण जो त्यांचा सत्कार करतोय तो त्यांच्या व्यावसायिक यशापेक्षा त्यांनी मंदिरांविषयी आणि आपल्या कामाविषयी दाखविलेल्या निष्ठेचे कौतुक करण्यासाठी, किंबहुना, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आहे. 'वर्क इज वरशिप' 'अंगीकृत काम म्हणजेच ईश्वरपूजा' असे म्हणतात. त्या दृष्टीने पाहिले तर नंदूशेट गेली चाळीस वर्षे मंदिरात उपासनाच करीत आहेत. पारायण, नामस्मरण करताना कोणी त्यांना पाहिलेले नसेल तरीही त्यांची साधना ही अखंडपणे सुरूच असते असे म्हणावे लागेल. सदगुरूंनी आपल्याकडे सोपवलेले काम मनापासून करणे, त्याचा बिलकूल गाजावाजा न करणे, ते वेळेत किंवा वेळेपूर्वीच पुरे करणे, शिवाय ते जसे सद्गुरूंना अपेक्षित आहे तसे करणे अशी त्यांच्या कामाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

आपण पाहतो की उत्सवांच्या पूर्वतयारीसाठी जी बैठक होते, त्या वेळी क्रमवार, कामाच्या यादीची चर्चा होते. त्या वेळी पाण्याच्या टाक्या स्वच्छ करणे हा एक विषय असतो. प्रत्येक वेळी नंदूशेट यांच्याकडून 'टाक्यांची स्वच्छता पूर्ण झालेली आहे.' असे उत्तर येते. मी गेली २०–२२ वर्षे हे प्रत्येक वर्षी पाहिलेले आहे. त्यांच्यावर सोपविलेले काम पूर्ण होणारच आणि तेही वेळेत असा एक विश्वास श्रीमहाराजांना होता. आणि तो तसा श्रीकाकांनाही आहे. त्यामुळे विहीर खोदायलाही श्रीमहाराजांनी त्यांचीच निवड केली आणि एखादा लेआऊट आखायलाही ते नंदूशेटनाच बोलवायचे.

श्रीमहाराजांच्या पसंतीला उतरेल असे काम करणे सोपे नव्हते. पण श्रीमहाराजांनी यांचे काम प्रथम पाहिले, तेव्हाच हा माणूस कामाचा आहे हे हेरले आणि त्याला आपल्या कृपाछत्राखाली घेऊन स्वतंत्रपणे आपल्या पायावर उभा केला. अगदी शशिकांतभाऊ सुतारांना सांगून नंदूशेटना महानगरपालिकेतून कामाचा अधिकृत परवाना मिळवून दिला. या विश्वासाचे त्यांनी चीजही केले.

१९९५ साली डेरवणला रुग्णालय सुरू झाले तेथपासून आजपर्यंत डेरवणाला सतत मोठमोठ्या इमारती होत आहेत. त्यामध्ये क्रीडासंकुलासारखा अवाढव्य प्रकल्प आहे. या सगळ्या कामात अर्थातच नंदूशेट यांचा महत्त्वाचा सहभाग होता. त्याविषयी बोलताना महाजनसाहेबांनी मला असे सांगितले की सर्वत्र इमारत पूर्ण झाली की प्लंबिंगचे काम सुरू होते. येथे मात्र इमारतीच्या पायाचे खड्डे घेऊन झाले की प्लंबिंगच्या कामाला सुरुवात व्हायची आणि कुठलेही, अगदी एकही, प्लंबिंग चुकले म्हणून पुन्हा करावे लागले, असे झाले नाही. क्रीडांगणावरील पाणी वाहून नेणारी भूमिगत गटारे त्यांनीच बांधून काढली. कोठेही पाणी साचत नाही आणि त्याबद्दल क्रीडा क्षेत्रातील सगळेच लोक आश्चर्य व्यक्त करतात. व्यावसायिक कौशल्याबरोबर त्यांनी आपल्या कामात श्रद्धा, समर्पणभाव, भक्ती, निष्ठा सगळं काही भरपूर ओतलं आहे. त्यामुळेच नंदूशेट आणि त्यांच्यासारखे काम करणारे अन्य लोक यामुळे डेरवणचे प्रकल्प विद्युतवेगाने पूर्ण होतात.''

सत्कारानिमित्ताने दिल्या जाणाऱ्या मानपत्राचे नंतर वाचन करण्यात आले.




*वे.मू. श्रीनिधी स्वानंद धायगुडे यांना उत्तम वेदाध्ययन पुरस्कार*



*वे.मू. मयुरेश मंदार फडके यांना उत्तम वेदाध्ययन पुरस्कार*

।। श्रीगणेशाय नम: ।।

।। श्रीसद्गुरुवासुदेवानंतसरस्वत्यै नम: ।।

।। श्रीसद्गुरुसहजानंदसरस्वत्यै नम: ।।

वेदवेदांगचक्रवर्ती वे.मू. कै.दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी आणि याज्ञिकप्रवर वे.मू. कै. लक्ष्मणराव विनायक सप्रेगुरुजी स्मृती समिती, श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, पुणे.

श्री.रा.रा. नंदू कान्होबा शेजवळ यांसी

सप्रेम नमस्कार,

कै. वेदवेदांगचक्रवर्ती वेदमूर्ती कै. दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी आणि याज्ञिकप्रवर वेदमूर्ती कै. लक्ष्मणराव विनायक सप्रेगुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित या समारंभात आपण श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात प्रदीर्घ काळ निरलसपणे केलेल्या सेवेचा यथायोग्य गौरव करण्यासाठी समितीतर्फे हे मानपत्र आपणास अर्पण करतांना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

आपण चाळीसपेक्षा जास्त वर्षे समाधिमंदिरात प्लंबिंग आणि तत्सम अन्य कामे करीत आहात. श्रीसहजानंदसरस्वती स्वामीमहाराजांनी आपली सचोटी, निष्ठा आणि कार्यकुशलता पाहून आपणास मंदिराशी अगदी निगडित करून घेतले आणि आपल्या व्यावसायिक कारकिर्दीला आकार दिला. आपणही श्रीमहाराजांवरील आपल्या श्रद्धेमुळे श्रीमहाराज आणि तदनंतर श्रीकाकामहाराज यांच्या मार्गदर्शनाखाली समाधिमंदिरात आणि डेरवण येथील सर्व प्रकल्पात स्वत:ला झोकून देऊन काम केले. या सर्व ठिकाणी पाणीपुरवठा व्यवस्थेत कोणतीही कसूर राहू नये म्हणून आपण सदैव दक्षतेने सर्व व्यवहार केला. ही आपली सेवा हे आपल्या सद्गुरूंवरील निष्ठेचेच दृश्यरूप आहे.

सद्गुरुसेवेमुळे आज आपण व्यवसायात सुस्थिर आहात, कौटुंबिक स्वास्थ्य, भौतिक संपन्नता याची आपणाला यथायोग्य प्राप्ती झाली आहे. किंबहुना आपण संसारात राहून परमार्थी कसे असावे याचे उत्तम उदाहरणच आहात.

वे.मू. कै. दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी आणि याज्ञिकप्रवर वे.मू. कै. लक्ष्मणराव विनायक सप्रेगुरुजी यांनी आयुष्यभर समाधिमंदिराची सेवा अत्यंत निष्ठेने केली. त्यांच्या स्मृतिसमारोहात त्यांच्याच शिष्यसमूहाकडून आपल्यासारख्या सेवाव्रतींचा सत्कार होण्यात विशेष औचित्य आहे. आपणास आणि आपल्या कुटुंबीयांना उत्तम आयुरारोग्य लाभावे, ही वेदपुरुषाच्या आणि सद्गुरूंच्या चरणी प्रार्थना.

अध्यक्ष, वेदवेदांगचक्रवर्ती वे.मू. कै. दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी आणि याज्ञिकप्रवर वे.मू. कै. लक्ष्मणराव विनायक सप्रेगुरुजी स्मृती समिती पौष शुद्ध नवमी शक १९४४; शनिवार, दि. ३१ डिसेंबर २०२२

यानंतर श्री. कमलेश जोशी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानधन देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना भावविवश झालेले श्री. शेजवळ संस्थेने केलेल्या प्रेमाच्या सत्काराबद्दल आभार मानून म्हणाले, ‘‘१९७८ साली मी प्रथम काही किरकोळ काम करण्यासाठी माझ्या कंत्राटदाराने पाठविल्यामुळे मंदिरात आलो. आल्यावर मंदिरात दर्शन करवून मला महाराजांकडे नेण्यात आले. महाराजांनी प्रथम विचारले की तुला काही व्यसन आहे का? मी नाही असे सांगितल्यावर मला सगळे नळ वगैरे चेक करून दुरुस्त करून ठेवण्यास सांगितले. सायंकाळी सर्व झालेले काम त्यांनी स्वत: येऊन पाहिले आणि मला ५० रुपये मजुरी दिली. त्या वेळी मला बाहेर सात रुपये मजुरी मिळे. म्हणून मी हे पैसे जास्त आहेत असे सांगितले तरीही त्यांनी ते बरोबर आहेत असे सांगून मला आश्चर्यचकित केले. मग मला अधूनमधून येत जा असे म्हणाले, त्याप्रमाणे मी येऊ लागलो. पुढे गुरुकृपा इमारतीचे काम मला करायला सांगितले. एकदा मी पाईप बसवत असताना ते म्हणाले, ‘‘तू हे कसले खिळे वापरत आहेस? मला कुऱ्हाडी खिळे पाहिजेत. दुसरे कसले चालणार नाहीत.’’ मग मी त्यांना प्लंबिंगचे खिळे कसे अधिक चांगले आहेत हे दाखविले आणि मग मला



वे.मू. स्वानंद धायगुडे यांचा सत्कार



वे.मू. स्वानंद धायगुडे यांचे सत्काराला उत्तर

ते वापरायची त्यांनी परवानगी दिली. मात्र त्याची सर्व जबाबदारी माझ्यावर राहील असेही मला बजावले! आतील बाथरूमची कामे करतानाही मला बजावले होते की लिकेज झाले तर तू जबाबदार! आज चाळीस वर्षे झाली पण अजून लिकेज झालेले नाही!

त्यानंतर काकामहाराजांनी एक दिवस मला कंत्राटदार किती पगार देतो ते विचारले. मी 'सात रुपये देतो' असे सांगताच ते म्हणाले की आम्ही तुझ्या कामाचे त्याला रोजचे ३५ रुपये देतो. मग मला मंदिरातर्फे काम करायला सांगितले आणि माझ्या कंत्राटदाराची हत्यारे परत करण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी त्याची हत्यारे परत देऊन आलो आणि मी मंदिरात रुजू झालो. माझ्याजवळ हत्यारे नव्हती. ती खरेदी करण्यासाठी काकामहाराजांनी ५०० रुपये दिले. मला कॉर्पोरेशनमधून प्लंबिंगचे लायसन्स काढण्यासाठी अर्ज करायला सांगितला. त्याप्रमाणे अर्ज केल्यावर पाणीपुरवठा खात्यातून मला मुलाखतीसाठी बोलावण्यात आलं. मुलाखत झाली आणि बरेच दिवस मला काहीच कळविण्यात आले नाही. असे चार महिने गेल्यावर महाराजांनी शशिकान्तभाऊ सुतारांना काय झाले ते पाहण्यास सांगितले. भाऊंनी कॉर्पोरेशनमध्ये जाऊन चौकशी केल्याबरोबर झटपट सूत्रे हालली आणि मला ताबडतोब परवाना मिळाला. मी तो महाराजांना दाखविल्यावर महाराज म्हणाले की आता तुला स्वतंत्रपणे कामे करायला मिळतील. आणि तेव्हापासून आजपर्यंत मला सतत भरपूर कामे मिळत गेली. कोणाकडे काम मागायला जावे लागले नाही. नेहमी कामे माझ्याकडे चालत आली. फर्ग्युसन कॉलेजच्या लोकांच्या चाळीचे काम मी करीत होतो. त्या वेळी कुलकर्णी नावाचे कॉन्ट्रॅक्टर होते. ते लाईनआउटचे काम करीत होते. त्यांना ते काम जमेना. म्हणून एक दिवस महाराज म्हणाले की मी उद्या तेथे येतो. महाराजांची शिस्त मोठी होती. कामगार साडेसातनंतर आले तर त्यांना ते परत पाठवीत. आम्ही साडेसात वाजता तेथे गेलो. प्लॅन पाहिला आणि आपल्या काठीने दाखवीत म्हणाले, 'नंदू येथे खुंटी मार. येथे दुसरी मार!' असे करीत अगदी थोडक्या वेळात त्यांनी लाईनआउटचे काम पूर्ण करून दिले आणि म्हणाले की आता तुम्ही हे चेक करून पाहा! ते सगळे अर्थातच बरोबर होते. मात्र आठ दिवस पूर्ण न होऊ शकलेले काम त्यांनी तास-दोन तासात पूर्ण करून घेतले!

एकदा महाराज म्हणाले की कॉर्पोरेशनचे पाणी आपणाला पुढे पुरणार नाही. आपणाला झाडामाडाला, साफसफाईसाठी भरपूर पाणी लागेल. येथे पाणी आहे. येथे आपण विहीर खोदू. त्याप्रमाणे मंदिरात काम करणाऱ्या तिघा-चौघांसह मी विहिरीची खोदाई सुरू केली. सुरुवातीलाच महाराजांनी आम्हाला बजावले की काम मध्येच अर्धवट सोडून जायचे नाही. काम पूर्ण करायचे! आधी मुरुम होता. पुढे काळा दगड लागला. तो तोडताना त्याचे तुकडे उडून आमच्या पायाला लागू लागले. तेव्हा महाराजांनी आम्हाला पायाला पोती बांधून काम करायला सांगितले. पण पुढे आमचे कष्ट पाहून त्यांनी पुढचे खोदकाम यंत्राद्वारे करवून घेतले. त्या विहिरीला भरपूर पाणी लागले आणि ते आजपर्यंत कधी कमी पडलेले नाही.

एकदा महाराज म्हणाले, ''नंदू, या सगळ्या झाडांची पिकलेली पाने काढून टाक.'' लहान झाडांचे ठीक होते. पण मोठ्या झाडांची पाने कशी काढणार? मी घाबरून गेलो. काकांना विचारले तर ते म्हणाले, ''अरे, मोठी झाडे हलवून पडतील तेवढी पाने पाड!'' पुढे महाराजांनी मला बाहेरची कामे घ्यायला परवानगी दिली. माझ्या एका ओळखीच्या साठे नावाच्या कंत्राटदाराची बरीच कामे सुरू होती. त्याने मला अभिनव विद्यालयाचे काम दिले. काम देताना एका इमारतीचे काम नमुन्यादाखल करायला सांगून, ते त्यांच्या आर्किटेक्टच्या पूर्ण पसंतीला उतरल्यावर पुढे त्यांची सगळी कामे मला मिळत गेली. मग मला भरपूर कामे मिळत गेली. कामाबरोबर पैसेही भरपूर मिळत गेले.

आत्ता माझ्याकडे चार फ्लॅट आहेत, मी राहतो ते घर आहे, कोथरूडमध्ये दुकान आहे. दोन चारचाकी गाड्या, पाच दुचाकी गाड्या आहेत. ही सगळी महाराजांची कृपा आहे. माझे बाहेरचे काम संपल्यावर फावल्या वेळात सायंकाळी मंदिरात येऊन काम करण्याचेही वेगळे पैसे काकामहाराज मला देत. महाराजांच्या




*श्री. नंदू शेजवळ यांचा सत्कार*



*श्री. नंदू शेजवळ यांचे सत्काराला उत्तर*

आणि काकामहाराजांच्या कृपेमुळेच मला हे करता आले. नाहीतर हे शक्य नव्हते.

महाराज सायंकाळी मंदिराच्या आवारातून फेरी मारायचे तेव्हा शाम्या कुत्रा बरोबर असे. मीही काही वेळा सोबत जात असे. शाम्या कुत्र्याला पाणी पिण्यासाठी महाराज एखादा नळ सुरू करीत तेव्हा तो नळाला तोंड न लावता पाणी प्यायचा. अशी महाराजांची शिस्त होती. महाराज चालू लागले की तो बाजूने चालू लागे. महाराज थांबले की तो थांबे.

माझा हा सत्कार येथे आपण केलात त्याबद्दल मी महाराजांचा, काकामहाराजांचा आणि आपला शतशः आभारी आहे.''

यानंतर आभारप्रदर्शन आणि वरयाचना पठणाने या सोहळ्याची सांगता झाली.



*पंडितप्रवर गणेश्वरशास्त्री द्राविड यांचे पंचायतनयागस्थळी आगमन*



*हरिपाठ*

*क्षणचित्रे*









**मालक, मुद्रक, प्रकाशक** : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे – २ येथे छापून
श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, ९३७ डी, ज्ञानेश्वर पादुका चौकाजवळ, शिवाजी नगर, पुणे – ४११ ०१६ येथून प्रकाशित केले.
**संपादक** : श्री. विनायक चिंतामण पराडकर, अध्यक्ष, श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती सेवामंडळ. दूरभाष क्र.: ०२०–२५६५५०२१